**Class / Semester / Subject Code: F.Y.B.A./ II / UBA 1.42 – Marathi - I**

दिनांक: 21.11.2019 वेळ: ३ तास एकूण गुण: १००

सूचना: १) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

प्र.१. अ) नाटकाची व्याख्या सांगा आणि नाटकाचे वाङ्मयीन घटक स्पष्ट करा. (२०)

किंवा

ब) मराठी नाटकाचा इतिहास सविस्तर विशद करा. (२०)

प्र.२. अ) एक 'आधुनिक सत्यशोधकी जलसा' या दृष्टीने 'सत्यशोधक' नाटकाचे विवेचन करा. (२०)

किंवा

ब) 'सत्यशोधक' हे नाटक महात्मा फुले यांच्या विचारकार्याचे दर्शन घडविणारे नाटक आहे या विधानाची चर्चा करा. (२०)

प्र.३. अ) आजच्या तरुणांना मिळणारे स्वातंत्र्य त्यांच्या नाते संबंधात कसे प्रतिबिंबित होते ते 'सिगारेट्स' या नाटकासंदर्भाने स्पष्ट करा. (२०)

किंवा

ब) 'सिगारेट्स' या नाटकातील व्यक्तिरेखांच्या मनातील गोंधळाचे स्वरूप स्पष्ट करा. (२०)

प्र.४. टीपा लिहा.

अ)

१) नाटकातील 'संवाद' हा घटक (१०)

किंवा

२) मराठी नाटकाचे टप्पे (१०)

ब)

१) 'सत्यशोधक' या शीर्षकाची समर्पकता (१०)

किंवा

२) डॉ. विश्राम घोले यांची व्यक्तिरेखा (१०)

क)

१) नंदिनीचा दृष्टीकोण (१०)

किंवा

२) गौतमचा अपराधीभाव (१०)

Sant Rawool Maharaj Mahavidyalaya, Kudal

प्र.५. एका वाक्यात उत्तरे लिहा. (**कोणतेही पाच**) (१०)

१) गोऱ्हे हे आडनाव फुले कसे झाले?
२) कोणाच्या शिफारशीवरून जोतिबांची शाळा पुन्हा सुरू झाली?
३) महात्मा फुले यांचे पूर्ण नाव सांगा.
४) मजुरांची पहिली संघटना कोणी बांधली?
५) आशिषची कोणती कृती नेहाला अनपेक्षित वाटते?
६) मुलांना जन्म देण्याविषयी नेहाचे विचार काय आहेत?
७) आशिषच्या घरात कोणकोण आहेत?
८) नंदिनीच्या पूर्वीच्या मित्राचे नाव काय?

*****************

Sant Rawool Maharaj Mahavidyalaya, Kudal